

# शिवस्वरूप

■ **बाळ ठाणेदार**



शिवाच्या मस्तकातून सतत ज्ञानगंगा वाहात राहिली आहे. शंकराच्या जटेतून गंगा निघते. तद्वतच ज्ञानी व्यक्तीसमोर कितीही कठीण प्रश्न असला तरी त्याच्या विशुद्ध बुद्धीत अशी विलक्षण शक्ती आणि हिंमत असते की त्याच्यायोगे तो जीवनाच्या कठीण समस्यांमधून तरून जातो.

हिमालयाचे हिमाच्छादित धवल गिरिशिखर हे शिवशक्तीचे निवासस्थान. ज्ञानाची विशुद्ध बैठक त्यात सूचित होते. चारित्र्याच्या शुद्ध बैठकीशिवाय ज्ञान सुशोभित होत नाही. कैलासाच्या उत्तुंग शिखरावर बसून शंकर आपल्याला असे समजावतात की शिवप्राप्ती म्हणजेच कल्याणप्राप्ती. ती मिळविण्यासाठी जीवनात निश्चित उंचीपर्यंत पोचलेच पाहिजे. प्रयत्नाविना प्राप्त होणारी शिव ही काही रस्त्यावर पडलेली गोष्ट नाही. कल्याणाचा मार्ग काटेरी आणि अवघड असतो. श्रेयाच्या मार्गावरून जाताना अनेक कठीण चढणी चढाव्या लागतात. कठीण साधनेशिवाय शिवत्व प्राप्त होत नाही.

शंकर त्रिलोचनी आहेत. त्यांनी त्यांच्या तिसऱ्या डोळ्यांनी कामदेवाला भस्मसात केले अशी गोष्ट आहे. खरा ज्ञानी स्वतःच्या ज्ञान अग्नीने वासनांना, कामनांना जाळून टाकतो. खऱ्या ज्ञानवंतावर झालेले कामाचे प्रहार अगदीच बोथट ठरतात.

पुष्पदंत कवीच्या शिवमहिम्न्यात असा उल्लेख आढळतो. विष्णू शंकराची पूजा करीत होते. विष्णूचा शंकराला एक हजार कमळे वाहण्याचा संकल्प होता. ती वाहत असताना एक कमळ कमी पडत आहे असे विष्णूच्या लक्षात आले. ताबडतोब विष्णूनी स्वतःचे

नेत्रकमळ काढून ते वाहिले. यात असे सूचित केले जाते की शंकर ज्ञानाची देवता आहे. विष्णू प्रेमाची देवता आहे. शंकराला विष्णूचा डोळा मिळाला पाहिजे. म्हणजेच ज्ञानवंताने सृष्टीकडे प्रेमाच्या नजरेने पाहिले पाहिजे.

महापुरुषाच्या मृत्युनंतर भगवान शंकर त्याचे भस्म स्वत:च्या कपाळावर लावतात. विभूतीला वैभव समजण्याची हिंमत ज्ञानी लोकांनी ठेवावी हे सुचविण्यासाठी शंकर भस्मलेपन करतात. सज्जनांना आश्वासन देण्यासाठी आणि दुर्जनांना भयग्रस्त करण्यासाठी शंकरांच्या हातात त्रिशूळ असतो. शंकर ही संहारक देवता असल्यामुळे त्यांच्या हातात त्रिशूळ शोभतो. त्या व्यतिरिक्त महादेवांच्या हातात डमरू आहे. डमरू हे संगीताचे प्रतीक. आद्य व्याकरणकार पाणिनी म्हणतात, "व्याकरणाचे बीजमंत्र मला डमरूच्या नादातून मिळाले आहे. माझ्या कानाजवळ डमरू वाजवून भगवान शंकरांनी मला हे ज्ञान दिले आहे." डमरू ज्ञानाचा उदगाता आहे.

भगवान शंकर स्वत:च्या शरीरावर सर्प खेळवता. सर्प हे विषयाचे प्रतीक. विषारी दात काढून टाकलेला साप हानीकारक नाही. तसेच विष काढून टाकलेले विषय नुकसानकारक नाहीत. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे विकार त्यांचे उदात्तीकरण करण्यात आले तर ते बाधक होत नाहीत. हे जहरी विकार महापुरुषाजवळ निर्विष आणि कार्याला साधक बनून राहतात.

समुद्रमंथनातून जेवढी रत्ने निघाली ती सर्वांनी घेतली. अमृत सर्वजण प्याले, परंतु विष निघताच सर्वांनी पळ काढला. त्यावेळी सर्व सृष्टीच्या कल्याणासाठी शिवासाठी हे विष भगवान शंकरानी पिऊन टाकले. ते नीलकंठ झाले. अमृत पितो देव पण विष पितो तो महादेव. शिवाचे म्हणजे कल्याणाचे काम करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने सतत विष पिण्याची कडू घोट पचविण्याची हिमत सतत ठेवली पाहिजे.

आपण सगळेच दुसऱ्याचे दोष अचूकपणे जाणतो. खरे ज्ञानवंत लोक ते जाणूनही बाहेर जाहीर करत नाहीत. आपल्या स्वत:त ते येऊ न देण्याचा कटाक्ष ठेवतात. भगवान शंकरांनी नव्याने उगविणारी बीजेची चंद्रकोर मस्तकावर धारण केली आहे. बीजेचे चंद्रकोर ही कर्मयोग्याचे प्रतीक समजली जाते. खऱ्या कर्मयोग्याला भगवान शंकर डोक्यावर धारण करतात. या गोष्टी याच्याच द्योतक आहेत.

माझ्या पणजीबरोबर महादेवाच्या देवळात मी लहानपणी जात असे. त्यावेळी पाहिलेले मला चांगलेच आठवते. शिवमंदिरात प्रवेश करताना प्रथम नंदीला व कासवाला नमस्कार केला जातो. नंदी हे शिवाचे वाहन. त्याप्रमाणेच आपण खऱ्या ज्ञानाचे वाहक बनलो तर आपलीही पूजा होईल. भगवानांचा बैलही पूजला जातो हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. कासवाचे दुसरे नाव कूर्म आहे. कूर्म हे इंद्रियनिग्रह व संयम यांचे प्रतीक आहे. शिवाजवळ जाण्यासाठी जीवन संयमी राखणे आवश्यक आहे. इंद्रियांचा गुलाम काही ज्ञानप्राप्ती करून घेऊ शकत नाही. म्हणजेच शिवापर्यंत पोचू शकत नाही. कासव हे संथ परंतु सातत्याच्या साधनेचे प्रतीक आहे. शिव बनण्याच्या प्रयत्नात व्यक्तीवर होणाऱ्या प्रहारापासून बचाव करण्यासाठी कासवाच्या पाठीसारखी भक्तीची मजबूत ढाल धारण करणे आवश्यक आहे.

थेंब थेंब ठिपकणाऱ्या पाण्याचा संतत अभिषेक शंकरावर केला जातो. हे थेंब थेंब ठिपकणारे पाणी सातत्य सुचविते.

शिवमंदिरात संपूर्ण प्रदक्षिणा करीत नाहीत. या मागचे रहस्य पुष्पदंताच्या कथेत सापडते. शिवनिर्माल्य ओलांडल्यामुळे व्यक्ती शक्तिहीन बनते. पुष्पदंत नावाचा गंधर्व फुलांची चोरी करीत असताना अजाणतेपणी शिवनिर्माल्य ओलांडून जातो. त्यामुळे तो शक्तिहीन होतो. त्याची अदृष्ट होण्याची शक्तीच नष्ट होते. असा शक्तिहीन बनलेला पुष्पदंत शिवाचा महिमा तेच शिवमहिम्न स्तोत्र. या रचिलेल्या शिवमहिम्नाने त्याची शक्ती परत येते. जे कार्य आणि जीवन प्रभूला वाहिले जाते. ज्यांना शिवनिर्माल्य समजले जाते अशा लोकांबद्दल किंवा त्यांच्या कार्याबद्दल अदातदा बोलणे हे शिवनिर्माल्याचे उल्लंघनच होय. असे करणारा कितीही शक्तिशाली असला तरी थोड्याच वेळात शक्तिहीन बनतो. यातून असे द्योतक होते की वाहिलेले चित्र, प्रभूसाठी कल्याणासाठी चालत असलेले कार्य तसेच प्रभूला अर्पण केलेले जीवन यांचा आपण सतत सन्मान ठेवला पाहिजे. अशा कार्यांची आणि व्यक्तींची अवगणना होऊ नये हेच यामागील रहस्य.

शंकराच्या मस्तकातून ज्ञानगंगा वाहते. चारित्र्याच्या उत्तुंग धवल शिखरावर ते बसले आहेत. साधेपणा हा त्यांचा शृंगार आहे. विभूतीला ते वैभव समजतात. सज्जनांचे संरक्षण आणि दुर्जन संहार हे त्यांचे जीवनव्रत. कर्मयोगी बाल चंद्राला त्यांनी मस्तकी धारण केलेले आहे. जगाच्या रक्षणासाठी त्यांनी हसतमुखाने विषप्रत केले. कल्याण आणि ज्ञान यांची ती साक्षात मूर्तीच आहे. असे हे शिवस्वरूप.

■

**बाळ ठाणेदार**